**नि.फौ.ख.क्र.२८/२००९**
सरकार – वि.- अमित कळमरकर
**निशाणी क्र.  ५६**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – लता बाबुलाल देशमुख - अटक पंच
वय – ७२ वर्षे, व्यवसाय – गृहीणी,
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचे मार्फत सुरु-</u>**

दि. १९/०९/२००९ रोजी मला मारकड साहेबांनी पोलीस स्टेशनमध्ये पंचनाम्याकामी बोलवले होते. त्यांनी एक आरोपी पकडला होता. पोलीसांनी माझे समक्ष त्याची अंगझडती घेवुन त्याचे नाव व गांव विचारले. त्याच्या ताब्यातुन ४००/- रुपये मिळाले होते, ते पोलीसांनी जप्त केले. पोलीसांनी माझे समक्ष त्यास अटक् करुन अटक पंचनामा तयार केला. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी व दुसरा पंच महेश गायकवाड व पोलीसांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि. क्र. ५७** देण्यात येतो. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.28 17:15:56 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २८/०१/२०२६